**ठळक बातम्या**

- विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी योजना ग्रामीण विधेयक लोकसभेत सादर, सव्वाशे दिवसांच्या रोजगार हमीची तरतूद

- महापालिका निवडणुकांच्या निमित्तानं युती आणि आघाड्यांसाठी जोरदार चर्चा सुरू

- सदनिका घोटाळ्याप्रकरणी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयातही दोषी

**आणि**

- महाराष्ट्र फाऊंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार अरुण खोपकर आणि लीलाताई चितळे यांना जाहीर

**<><><><><>**

विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी योजना (ग्रामीण) विधेयक, २०२५ अर्थात विकसित भारत - जी राम जी विधेयक आज लोकसभेत मांडण्यात आलं. हे विधेयक २० वर्षांपासून चालत आलेल्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ अर्थात 'मनरेगा'ची जागा घेईल. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

## होल्ड कॅप्सूल (२ मिनिट)

*(विद्यमान मनरेगात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी दिली आहे. प्रस्तावित विधेयकात सव्वाशे दिवसांच्या कामाची हमी प्रस्तावित आहे. पेरणी किंवा कापणीच्या हंगामात एकंदर ६० दिवसांचा कालावधी अधिसूचित करायचा अधिकार राज्यांना दिला आहे. यादरम्यान मनरेगाचं काम थांबवलं जाईल, जेणेकरून शेतीतल्या कामांना मजुरांची कमतरता भासणार नाही. पूर्वी या योजनेचा संपूर्ण निधी केंद्र सरकार द्यायचं. आता मोठ्या राज्यात ६० टक्के निधी केंद्राचा आणि उर्वरित ४० टक्के वाटा हा राज्यांचा असेल. ईशान्येकडची आणि हिमालयातल्या राज्यांमध्ये केंद्राचा वाटा ९० टक्क्यांपर्यंत वाढेल. याविषयी कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले...*

***होल्ड... बाईट- शिवराज सिंह चौहान***

*या मूळ योजनेतून महात्मा गांधींचं नाव काढून टाकल्याचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस, द्रमुक आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू केली आणि हे विधेयक मागे घ्यायची मागणी केली. याविषयी खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या…*

***होल्ड… बाईट- प्रियांका गांधी***

*विरोधकांचा गोंधळ सुरू राहिल्यानं सभापतींनी काहीकाळ कामकाज तहकूब केलं होतं. )*

**<><><><><>**

राज्यात महापालिका निवडणुका काल जाहीर झाल्या. मुंबई महापालिका निवडणुकीची अधिसूचना आज प्रसिद्ध झाली. या पाठोपाठ या निवडणुकांसाठी आता युती, आघाडी करण्यासंदर्भात चर्चांनीही जोर धरला आहे.

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजपा-महायुती विजयी होईल आणि २९ महानगरपालिकांचे महापौर हे महायुतीचेच होतील असा दावा भाजपचे नेते आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज व्यक्त केला.

जिथे भाजप मजबूत आहे तिथे भाजप आणि जिथे शिवसेना मजबूत आहे तिथे शिवसेना निवडणूक लढवेल, असा निर्णय वरिष्ठ स्तरावर झाला असल्याचं त्यांनी सांगितलं. पिंपरी-चिंचवडसह इतर महानगरपालिकांमध्येही महायुतीतल्या चर्चा वेग घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची नवी दिल्लीत भेट घेतली आणि महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने चर्चा केली.

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात युती होणार असून येत्या आठवड्यात याबद्दलची घोषणा केली जाईल, असं खासदार संजय राऊत यांनी मुंबईत वार्ताहरांना सांगितलं.

**होल्ड बाईट राऊत**

काँग्रेसनेही आपल्यासोबत निवडणूक लढवावी अशी विनंती त्यांना केल्याचं राऊत यांनी सांगितलं.

महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये राज्यस्तरीय समितीनं शिक्कामोर्तब केल्याशिवाय आघाडीबाबतचा कोणताही निर्णय घेतला जाणार नाही, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. महानगरपालिका निवडणुकीच्या रणनितीसाठी काँग्रेसची दोन दिवसीय बैठक झाली. या निवडणुकीबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी राज्याच्या संसदीय मंडळाची बैठक २४ आणि २५ डिसेंबर रोजी होणार असून त्यात या सर्व विषयांवर चर्चा होईल, असं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- हर्षवर्धन सपकाळ***

याच बैठकीत उमेदवारांबद्दलचा अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचंही सपकाळ यांनी सांगितलं.

पुणे महानगरपालिका निवडणूक महाविकास आघाडीतले घटक पक्ष एकत्रित लढवणार असल्याचं आघाडीच्या नेत्यांनी आज जाहीर केलं.

नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपानं इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घ्यायला सुरुवात केलीय. १५१ जागांसाठी तब्बल 1 हजार 489 इच्छुकांनी भाजपकडे उमेदवारीसाठी अर्ज केला आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी आज धुळे शहर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या निवडणुकीत ५५ पेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणण्याचा संकल्प सर्व पदाधिकाऱ्यांनी केला.

**<><><><><>**

मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून मिळवलेल्या चार सदनिकांच्या घोटाळ्याप्रकरणी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे,

आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना आज नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं दोषी ठरवलं.

सवलतीच्या दरात घरं मिळवण्यासाठी कोकाटे यांनी खोटी कागदपत्रं सादर केली, तसंच आपल्या नावावर घर नसल्याचं प्रतिज्ञापत्र दिल्याचा आरोप त्यांच्यावर होता. याप्रकरणी याआधी २० फेब्रुवारीला नाशिकच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी कोकाटे बंधूंना दोषी ठरवत दोन वर्षांचा सश्रम कारावास आणि ५० हजारांच्या दंडाची शिक्षा सुनावली होती. त्याविरुद्ध कोकाटे यांनी जिल्हा आणि सत्र न्यायालयात दाद मागितली होती. आज जिल्हा व सत्र न्यायाधीश पी.एम.बदर यांच्या न्यायालयात या खटल्याची अंतीम सुनावणी झाली. त्यांनी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी दिलेला निकाल कायम ठेवत, दोन वर्षे सक्तमजुरी आणि दहा हजार रुपये दंड, अशी शिक्षा सुनावली.

राज्य सरकारनं माणिकराव कोकाटे यांची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि सुनिल केदार यांना शिक्षा होताच २४ तासात त्यांची खासदारकी, आमदारकी रद्द केली होती, पण माणिकराव कोकाटे यांना मात्र सरकार वाचवत आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र फाउंडेशनचे यंदाचे साहित्य आणि समाजकार्य पुरस्कार आज जाहीर झाले. त्यात दिलीप चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार अरुण खोपकर यांना, तर समाजकार्य जीवन गौरव पुरस्कार नागपुरच्या लीलाताई चितळे यांना मिळाला आहे. २ लाख रुपये आणि स्मृतीचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. डॉ नरेंद्र दाभोळकर स्मृती पुरस्कार पश्चिम बंगालचे मनीष राय चौधरी यांना जाहीर झाला आहे. १ लाख रुपये आणि स्मृतीचिन्ह असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे.

इतर पुरस्कारांमधे ललितसाहित्यासाठी निखिलेश चित्रे यांना, वैचारिक-अंपारपरिक ग्रथपुरस्कार सोलापूरचे विनय नारकर यांना, तर रा. शं दातार नाटयलेखन पुरस्कार पुण्याचे ऋत्विक व्यास यांना जाहीर झाला आहे. सामाजिक कार्यकर्ता संघर्ष पुरस्कार गडचिरोलीचे प्राध्यापक जावेद पाषा यांना, तर सामाजिक कार्यकर्ता प्रबोधन पुरस्कार पुण्याचे दत्ता देसाई यांना मिळाला आहे. ५० हजार रुपये आणि स्मृतीचिन्ह असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे.

**<><><><><>**

१९ वर्षाखालच्या, आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत झालेल्या सामन्यात भारतानं मलेशियावर ३१५ धावांनी विजय मिळवला. मलेशियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केल्यावर भारतानं निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून ४०८ धावा केल्या. त्यात अभिज्ञान कुंडूच्या द्विशतकी खेळीचा मोलाचा वाटा आहे. त्यानं नाबाद २०९ धावा केल्या. त्यात १७ चौकार आणि ९ षटकारांचा समावेश होता. वेदांत त्रिवेदीनं ९०, तर वैभव सूर्यवंशीनं ५० धावांचं योगदान दिलं. मलेशियातर्फे मुहम्मद अक्रमनं पाच गडी बाद केले.

भारताच्या कठीण आव्हानापुढं मलेशियाची फलंदाजी पूर्णपणे ढासळली. ३२ षटकं आणि एका चेंडूत त्यांचा संघ ९३ धावात गारद झाला. भारतातर्फे दीपेश देवेंद्रनं पाच बळी घेतले. अभिज्ञान कुंडू सामन्यातला उत्कृष्ट खेळाडू ठरला.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात राज्यात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. सर्वात कमी तापमान गोंदिया इथं ८ पूर्णांक ४ दशांश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा  हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**